# सामाजिक,आर्थिक व जात सर्वेक्षण — २०११ अंतर्गत जाहीर नोटीस

सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण — २०११ अंतर्गत २६ ऑगस्ट २०१५ रोजी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामधील कुटुंबांच्या माहितीची प्रारूप यादी शासन सूचनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेचे प्रभाग समीती क्र. १ ते ४ मध्ये छापील प्रतीमध्ये प्रसिध्द होणार आहे.

सामाजिक,आर्थिक व जात सर्वेक्षण — २०११ प्रसिध्द यादीमधील काही कुटुंबांना आपले दावे व आक्षेप नोंदवायचे असतील तर यादी प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवस वेळेची मर्यादा आहे. या विहीत मर्यादेनंतर आलेले दावे व आक्षेप अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. सदर दावे व आक्षेप दाखल करण्यासाठी संबंधित प्रभागसमीती स्थरावर स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आलेला आहे. तसेच सदरचे दावे व आक्षेप हे संबंधित प्रभाग समीती कार्यालयात शासनाने दिलेल्या प्रपत्र अ,ब,क,ड फॉर्ममध्ये एकावेळी फक्त एकास नोंदविता येतील. दावे व आक्षेप दाखल करणेसाठी विहीत नमुन्यातील अर्ज विहीत मुदतीत संबंधिताकडे पोहोचेल या दृष्टीने पोस्टानेसुध्दा पाठवता येईल. याकरिता सदरील जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

१. नमुना अ :— प्रारूप यादीमध्ये प्रसिध्द केलेल्या माहितीवर आक्षेप दाखल करण्याबाबतचा नमुना.
२. नमुना ब :— प्रारूप यादीमधील समाविष्ट स्वत:च्या माहितीच्या तपशिलात सुधारणा वा फेरबदल करण्याबाबतचा नमुना.
३. नमुना क :— प्रगणकाने दरम्यान वगळलेल्या/राहण्याच्या/नेहमीच्या ठिकाणापासून दूर असलेल्या व्यक्तीची नावे प्रारूप यादीमध्ये समाविष्ट करणेबाबतचा नमुना.
४. नमुना ड :— ज्या व्यक्तीबद्दल आक्षेप नोंद करण्यात आलेला आहे त्यास द्यावयाचा नोटिस नमुना असून ज्या व्यक्तींना आक्षेप घेतला आहे त्यांना अपील अधिकाऱ्यांकडून सुनावणीची दिनांक, वेळ व ठिकाण दिले जातील.

उपरोक्त नमुद अ,ब,क,ड हे फॉर्मस् सहा. आयुक्त प्रभागसमीती कार्यालय यांचे मार्फत स्वीकारण्यात येतील. त्याचवेळी सुनावणीची तारीख, वेळ, ठिकाण व सुनावणी घेणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव याची माहिती देण्यात येईल. अर्जातील सर्व माहिती भरणे व अर्जावर स्वाक्षरी/अंगठा असणे क्रमप्राप्त आहे. याप्रमाणे नसलेले अर्ज व एक गठ्ठा अर्ज स्विकारले जाणार नाहीत. उपरोक्त नमुन्याचे अर्ज व प्रारूप यादी ही www.thane.nic.in व www.umc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

याकामी प्रभाग समीती निहाय प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूक करण्यांत आल्या आहेत. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्णयाविरोधात अपील करावयाचे झाल्यास प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या ७ दिवसात द्वितीय अपिलीय अधिकारी यांचेकडे अपील दाखल करावयाचे आहे. त्यांनी दिलेला निर्णय अंतिम असेल. अपीलकर्त्यांनी सुनावणीच्या वेळी पुराव्यासह हजर राहून आपली बाजू मांडावी. दावे व आक्षेप हे प्रकाशित केलेल्या मुद्दयांवरच घेण्यात येतील. मुदतीनंतरचे दावे व हरकती स्वीकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. दावे व आक्षेप संदर्भात विहीत नमुन्यातील अर्ज अ,ब,क,ड हे प्रभाग समीती कार्यालय येथे उपलब्ध आहेत.

सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण— २०११ साठीची प्रारूप यादी प्रसिध्द झाल्यापासूनची कार्यवाही उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात होणार असल्याने सर्व जनतेने याची नोंद घ्यावी असे जाहीर निवेदन करण्यात येत आहे.

24.08.15

उप आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका